# ग्रीनलॉन्स विदयालय

**दिनांक - १९-०९-२०२५ TERMINAL EXAMINATION (2025) वेळ - २तास**

**इयत्ता - ७ वी - अ,ब,क मराठी मार्क - ८०**

**INSTRUCTIONS:- 1.This paper comprises of two sections. Section A and B.**

**2. Section A answers must be written on the answer sheet.**

**3. Section B answers must be written on the paper itself. And Attach paper with section A answer sheet**

## विभाग - "अ " [४० मार्क]

प्रश्न १. अ) कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा. [५]

१. दवाखान्यात खूप ------------------------------------ होती.

( गर्दि, सर्दी, गर्दी )

२. तिने आजपर्यंत कधीच ------------------------ वाचन केले नव्हते.

( वाचन, अवांतर, पाठांतर )

३. आपण एकदाही कधी --------------------------------- नव्हतो.

( दुखणेकरी, तब्येतीने, दुकनेकरी )

४. सोनालीला ----------------------------- देण्यासाठी बाबांनी तिला एक छानसे भेट म्हणून दिले.

( प्रोत्साहन, वाढदिवसाला, शाळेत )

५. डॉक्टरांचे हे बोलणे ऐकून माझी फार -------------------------- झाली.

( निराशा, नैराश्य, हताशा )

प्रश्न १. ब) कोण - कोणास म्हणाले ते लिहा. [२]

१. "मला एका शाळेत पाहुणी म्हणून बोलावले आहे."

२. "तुम्हाला ऑपरेशन करता येतं का हो."

प्रश्न २. अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. **( कोणतेही ५) ANY 5** [५]

१. प्रार्थना कोणी लिहिली आहे?

२. सगळे अक्षर खेळ कसे खेळतात?

३. सोनालीच्या घरात वाचनाची आवड कोणाकोणाला होती?

४. शब्दांचे घर कवितेचे कवी कोण आहेत?

५. मुलाच्या घरातील व्यक्ती औषध म्हणून काय काय खायचे?

६. मुले कोणाला नमस्कार करीत आहेत?

प्रश्न २. ब) खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा. [४]

१. मुलाने डॉक्टरांकडून औषध आणायचे का ठरवले?

२. डॉक्टरांचे बोलणे ऐकून मुलगा निराश का झाला?

प्रश्न ३. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.

सोनालीने आतापर्यंत बऱ्याच नोंदी वहीत केल्या होत्या. आईला मदत, ही एक नवीन नोंद होईल, बाई शाबासकी देतील या विचाराने तिने पटकन 'हो' म्हणून आईच्या हातातले पुस्तक घेतले.

आईने तिला दिलेल्या पुस्तकात छोट्या छोट्या कथा होत्या. नुसत्या कथांची नावे वाचून कोणती कथा निवडावी हे तिला कळेना. शेवटी तिने नाइलाजाने एक-एक करून जवळ जवळ दहा कथा वाचल्या. अवघ्या एक-दीड तासात सारे पुस्तक वाचून झाले. खरेतर प्रथम तिला हे फारच कंटाळवाणे वाटले होते; पण जसजशी ती पुस्तकातल्या कथा वाचू लागली, तसतशी तिला पुढची कथा काय आहे, त्यात काय लिहिले आहे, याविषयी उत्सुकता वाटू लागली. त्यानंतर तिने पुस्तक केव्हा संपवले, हे तिलाच कळले नाही.

कथा तर सगळ्याच आवडल्या, त्यांतली कोणती निवडावी ते समजेना. ती आईकडे गेली व आपल्या समोरील समस्या सांगितली. मग आईने तिला प्रत्येक कथेचा थोडक्यात सारांश एका पानावर लिहिण्यास सांगितले. सोनालीला प्रथम हे काम सोपे वाटले; पण - दोन कथांनंतर पुढच्या कथेत काय आहे हे पटकन आठवेचना. तिने आईला 'मी पुन्हा एकदा पुस्तक ते' म्हणून सांगितले. खरेतर आज घरात आजी, आजोबा, बाबा, दादा, काकू, काका या साऱ्यांनाच सोनालीकडे पाहून नवल वाटत होते.

आता तिने एक पान घेतले, त्या पानावर कथेचे अन् त्या कथेत काय सांगितले आहे ते थोडक्यात लिहिले. बघता बघता तिचे पान भरले होते. ती पळतच आईकडे गेली अन् तिने आईला ते पान दाखवले. ते सारे पाहून तिचे खूप कौतुक वाटले. आईने घरातल्या साऱ्यांपुढे कौतुक केल्यामुळे तिचा गगनात मावत नव्हता.

प्रश्न

**कृती १.** खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. [३]

१. सोनालीला काय समजत नव्हते?

२. सोनालीचा आनंद गगनात का मावत नव्हता?

३. आईने पानावर काय लिहायला सांगितले?

**कृती २.** सोनालीला वाचताना पाहून घरात कोणाकोणाला नवल वाटत होते? [२]

**कृती ३.** रिकाम्या जागा भरा. [१]

१. अवघ्या एक-दीड तासात सारे ---------------------------- वाचून झाले.

२. सोनालीने आतापर्यंत बऱ्याच नोंदी -------------------------------- केल्या होत्या.

**कृती ४.** खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. [१]

( माहिती,कथा, समस्या, अडथळा )

१. गोष्ट - ---------------------------- २. अडचण - ----------------------------------

**कृती ५.** लिंग बदला. [१]

( अजोबा, आई, आजोबा, आइ )

१. बाबा - ---------------------------- २. आजी - ------------------------------------

प्रश्न ४. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर पत्र लिहा. **(ANY 1)** [५]

१. तुम्ही भेट ( You visited) दिलेल्या एका गडाचे (किल्ल्याचे) ( fort )वर्णन ( Describe) करणारे पत्र मित्राला/मैत्रिणीला लिहा. (write a letter to your friend)

२. तुम्ही आजारी ( Not Well) असल्यामुळे पुढचे चार दिवस शाळेत उपस्थित राहू शकत नसल्याचे ( I will be unable to attend school for the next Four Days) विनंती पत्र तुमच्या वर्गशिक्षकांना लिहा. ( write a leave application to your class teacher)

प्रश्न ५. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा. [५]

१. मी वाचलेले पुस्तक

**मुददे** - पुस्तकाचे नाव - लेखक - पुस्तकात काय आवडले - काय शिकता आले - कोणती पुस्तके वाचावीत.

२. माझा साहसी मित्र -

**मुददे** - मित्राचे नाव - त्याचे वर्णन - चांगल्या गोष्टी - त्याने केलेले साहस - मित्र का आवडतो.

३. आपली समस्या प्रदूषण

**मुददे** - प्रदूषण म्हणजे काय - प्रदूषणाचे प्रकार - कसे होते- तोटे - करणे - परिणाम - उपाय - कसे थांबवू शकतो.

प्रश्न ६. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम तमिळनाडू राज्यातील रामेश्वर या गावी जन्मले. त्यांच्या वडिलांचे नाव जैनुलबद्दीन व आईचे नाव आशियम्मा. लहानपणापासूनच ते कुशाग्र बुध्दीचे होते. त्यांना वाचनाची अतिशय आवड होती.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना बालपणापासून पक्ष्यांचे उडणे अतिशय रम्य आणि गूढ वाटायचे. सीगल पक्षी आणि बगळे यांना आकाशात झेपावताना पाहून त्यांच्यासारखे आपणही आकाश विहार करावा अशी त्यांना इच्छा होत असे. ते मनाशी नेहमी म्हणत असत, कि "एक दिवस मी देखील आकाशात अशी झेप घेईन." पुढे खरोखरच विमानात बसून आकाशात झेपावणारी ती रामेश्वरमधील पहिली व्यक्ती ठरली तसेच विख्यात अणुशास्त्रज्ञ म्हणून नावारुपास आली.

सकाळी फिरणे, प्रार्थना, योगासने, आंघोळीपूर्वी केसांना तेल लावणे, दिवसभराच्या अथक कामानंतर रात्री शास्त्रीय संगीत, बातम्या ऐकणे व पेलाभर दूध पिऊन झोपणे हा त्यांचा दिनक्रम असे. दक्षिण भारतीय जेवण त्यांना मनापासून आवडत असे.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना परदेशी जायला फारसे आवडायचे नाही. देशातच माझे काम आहे असे ते म्हणत. ते खूप खिलाडू वृत्तीचे होते. आपल्या चुकांसाठी हाताखालच्या लोकांना ते जबाबदार धरणे त्यांना आवडत नव्हते. डॉ. कलामांनी सुरेख अशा कविताही लिहिल्या आहेत. ते वीणाही वाजवत. कुराणाबरोबरच भग्वद्गीताही वाचत. विद्यार्थ्यांनी भरपूर शिकून मोठे होऊन देशासाठी काहीतरी करावे असा त्यांचा मानस असे.

प्रश्न

**कृती १.** खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. [२]

१. अब्दुल कलाम यांची इच्छा काय होत असे?

२. अब्दुल कलाम यांचा मानस काय होता?

**कृती २.** खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा. [२]

१. अब्दुल कलाम यांचा दिनक्रम काय असे?

**कृती ३.** रिकाम्या जागा भरा. [१]

१. ते खूप ---------------------------------- वृत्तीचे होते.

२. लहानपणापासूनच ते ---------------------------------------- बुध्दीचे होते.

**कृती ४.** खालील इंग्रजी शब्दांचे मराठीत अर्थ लिहा. [१]

( कुशाग्र, गाणे, संगीत, मूर्ख )

१.Sharp- ---------------------------------------- २. Music - -------------------------------------

# ग्रीनलॉन्स विदयालय

**INSTRUCTIONS – Section B answers must be written on the paper itself. And attach paper with Section A answer sheet.**

| **नाव - ------------------------------------** | **हजेरी क्र. - ----------------** | **इयत्ता - ७ वी - अ,ब,क** |
|---|---|---|

**विभाग - "ब"** **[४० मार्क]**

प्रश्न १. खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहा. [४]

| |
|---|
| निशित करणे, शरम वाटणे, यशस्वी होणे, समाधान वाटणे, टीपण ठेवणे, मन तयार करणे, निश्चित करणे, प्रेरणा करणे, कौतुक करणे, लक्षात येणे, प्रेरणा देणे, चिंता न करणे. |

१. प्रोत्साहन देणे - ------------------------------------ २. सफल होणे - ------------------------------------

३. लाज वाटणे - ------------------------------------ ४. ध्यानात येणे - ------------------------------------

५. ठरवून टाकणे - ------------------------------------ ६. मन वळवणे - ------------------------------------

७. नोंद ठेवणे - ------------------------------------ ८. धन्य वाटणे - ------------------------------------

प्रश्न २ अ) खालील वाक्यांतील नामे ओळखून त्यांचे प्रकार लिहा. [३]

१. आकाशात पक्षी उडत होते.

उत्तर - नाम - ---------------------------- प्रकार - ------------------------------------------------

२. रायगड किल्ला खूप मोठा आहे.

उत्तर - नाम - ---------------------------- प्रकार - ------------------------------------------------

३. तो सुगंध सभोवताली पसरला होता.

उत्तर - नाम - ---------------------------- प्रकार - ------------------------------------------------

प्रश्न २ ब) खालील वाक्यांतील सर्वनाम ओळखा. [३]

१. शहामृग पक्षी आम्हांला आवडतो. सर्वनाम - ------------------------------------

२. ज्याने मदत केली,त्याने पुढे यावे. सर्वनाम - ------------------------------------

३. हा रानमेवा आहे. तो शेतात उगवतो. सर्वनाम - ------------------------------------

प्रश्न २ क) खालील वाक्यांतील विशेषण ओळखून त्यांचे प्रकार लिहा. [३]

१. मला काही चांगल्या लेखकाची पुस्तके हवी आहेत.

उत्तर - विशेषण - ---------------------------- प्रकार - ------------------------------------------------

२. ते मित्र शाळेत भेटले.

उत्तर - विशेषण - ------------------------------ प्रकार - --------------------------------------------------

३. रंगीबेरंगी इंद्रधनुष्य आकाशात सुंदर दिसते.

उत्तर - विशेषण - ------------------------------ प्रकार - --------------------------------------------------

प्रश्न ३ अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. [३]

| हसतं, आक्रोश, राग, नैपुन्य, घर, वही, दीप, भरवसा, नैपुण्य, भरंवसा, दिप, हस्त |
|---|

१. क्रोध - ---------------------------------- २. चोपडी - ------------------------------------

३. खात्री - ---------------------------------- ४. प्राविण्य - ------------------------------------

५. दिव - ---------------------------------- ६. हात - ----------------------------------------

प्रश्न ३ ब) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. [३]

| सुष्म, सर्पशत्रू, महाग, समेट, निद्रिस्त, संवाद, दुय्यम, निद्रिस्थ, माहाग, सूक्ष्म, दूय्यम, सर्पशत्रु |
|---|

१. भांडण X ---------------------------------- २. प्रचंड X ----------------------------------------

३. स्वस्त X ------------------------------------ ४. जागृत X --------------------------------------

५. उत्तम X ------------------------------------ ६. सर्पमित्र X ------------------------------------

प्रश्न ३ क) खालील शब्दांचे वचन बदला. [३]

१. खोरे - --------------------------------------- २. चोपडी - --------------------------------------

३. देखावा - ------------------------------------ ४. उदाहरण - ----------------------------------

५. मुजरा - ------------------------------------- ६. भाजी - ----------------------------------------

प्रश्न ३ ड) खालील शब्दांचे लिंग बदला. [३]

१. माकड - ------------------------------------- २. खुळा - ----------------------------------------

३. बैरागी - ------------------------------------- ४. बादशहा - ------------------------------------

५. मोर - ------------------------------------------ ६. कलावंत - -------------------------------------

प्रश्न ४ अ) खालील शब्दांचे अर्थ लिहा. [३]

| ताप्तर्य, जिव्हाळा, विकास, फक्त, तोरा , तात्पर्य, आनंद, नमन, वीकास, तोटा |
|---|

१. निदान - -------------------------------------- २. प्रगती - ----------------------------------------

३. समाधान - ------------------------------------ ४. सारांश - ----------------------------------------

५. नमस्कार - ------------------------------------ ६. ऐट - ----------------------------------------------

प्रश्न ४ ब) खालील शब्दांपासून वाक्य तयार करा. (make sentences using these words) [३]

१. छंद (Hobby) - ----------------------------------------------------------------------------------------------------------

२. वाचनालय (Library) - -----------------------------------------------------------------------------------------------

३. प्रार्थना (prayer) - -----------------------------------------------------------------------------------------------------

प्रश्न ४ क) खालील दिलेल्या कवितेच्या ओळी पूर्ण करा. [४]

| |
|---|
| शक्ति, प्रगतीचे, धुसफुससुद्धा, सुख दुःखाचें, शक्ती, भक्ति, भावरूप, सुखदुःखाचे, धुसपूससुध्दा, अर्थ, भक्ती, छान, प्रगतिचे. |

१. शब्दरूप ---------------------------दे

----------------- -------------------------दे

---------------- पंख दे चिमणपाखरा

२. एखादयाची ---------------------------- हवीहवीशी -----------------------

प्रत्येकाला ---------------------- वेगळा ---------------------------------भान.

प्रश्न ५. अ) खालील शब्दांतून अचूक शब्द निवडून लिहा. [३]

१. आमूलाग्र, अमुलाग्र, अमूलाग्र, आमूळाग्र - ---------------------------------------------------------

२. व्हिडीओ, व्हिडियो, विडीओ, व्हिडिओ - ---------------------------------------------------------

३. इन्जेक्शन, इंजेक्षन,इंजेक्शन, इंजेक्शनं - ----------------------------------------------------------

४. नितिमंत, नीतिमंत, नीतिमांत, नीतिमन्त - ---------------------------------------------------------

५. कौपुटर, कॉम्पुटर,कॉम्प्युटर, कोम्पुटर - ---------------------------------------------------------

६. निमोनिया,न्यूमोनियां,न्यूमोनीया,न्यूमोनिया - -------------------------------------------------------

प्रश्न ५. ब) खालील विरामचिन्हांच्या योग्य जोड्या लावा. [२]

| **क्र.** | **विरामचिन्हे** | **उत्तर** | **चिन्हांची नावे** |
|---|---|---|---|
| १. | ! | ------------------------------------ | अवतरणचिन्ह |
| २. | , | ------------------------------------ | प्रश्नचिन्ह |
| ३. | "-" | ------------------------------------ | स्वल्पविराम |
| ४. | ? | ------------------------------------ | उदगारचिन्ह |